जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - दिनांक -०३/११/२०२४**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा, पुणे शहर

## एकूण १९,४५,०००/- रू कि.चा ओजीकुश गांजा, एम.डी. व एल.एस.डी. हे अंमली पदार्थ व इतर ऐवज हस्तगत करुन तीन इसमांना केले जेरबंद

मा.वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी पुणे शहरातील गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता तसेच अंमली पदार्थ तस्करांची माहिती काढुन त्यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत दिलेल्या सुचना व आदेशानुसार,

अंमली पदार्थ विरोधी पथक-१ कडील (अति.कार्यभार) पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन गायकवाड,व पोलीस निरीक्षक श्री. उल्हास कदम यांचे मार्गदर्शनाखाली दि.०२/१२/२०२४ रोजी सिंहगडरोड पो.स्टे कार्यक्षेत्रात अंमली पदार्थ विरोधी पथक-१ कडील अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करीत असताना, पेट्रोलिंग दरम्यान **पोलीस अंमलदार संदिप शिर्के** यांना प्राप्त झालेल्या माहितीचे अनुषंगाने कृष्णा/घोडनदीकर टॉवर बिल्डींग जवळ, श्री लॉज समोर सार्वजनिक रोड लगत, भुमकर चौक, न-हे आंबेगाव पुणे या ठिकाणी सापळा रचुन इसम नामे- १) अंशुल संतोष मिश्रा वय २७ वर्षे, रा. सराफ लाईन मिश्रानिवास बुलढाणा २) आर्श उदय व्यास वय २५ वर्षे, रा. १८५/५/८०, त्रिशुल शिवाजी टेक्निकल स्कुल समोर, पंत नगर,घाटकोपर इस्ट मुंबई ३) पियुश शरद इंगळे वय २२ वर्षे, रा. फ्लॅट नं ०८, आदित्य हेरिटेज, स्पाईन रोड, चिखली, चिंचवड पुणे यांना ताब्यात घेतले असता, त्यांचे झडतीमध्ये. **१७,४१,०००/- रू.किं.चा**,त्यामध्ये **२५१ ग्रॅम वजनाचा ओजीकुश गांजा, १५ ग्रॅम वजनाचे एम.डी. व ६२ मि.ग्रॅम वजनाचे एल.एस.डी. असा अंमली पदार्थ व २,०४,०००/-रू.कि.चा इतर ऐवज असा एकूण १९,४५,०००/- रू कि.चा ऐवज हा** अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आल्याने त्यांचेविरुध्द सिंहगड रोड पोलीस ठाणे, पुणे याठिकाणी एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(अ), २२(ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार,मा.पोलीस सह आयुक्त, पुणे श्री.रंजनकुमार शर्मा,मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे,पुणे श्री.निखील पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १,श्री.गणेश इंगळे,यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील (अति.कार्यभार) पोलीस निरीक्षक श्री. सुदर्शन गायकवाड व पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम सहा.पो.निरीक्षक, अनिकेत पोटे, पोलीस उप निरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलीस अंमलदार संदिप शिर्के, सचिन माळवे, विनायक साळवे, प्रविण उत्तेकर, संदेश काकडे, दत्ताराम जाधव, सुजित वाडेकर, नुतन वारे, रेहाना शेख, विपुल गायकवाड यांनी केली.